
Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)


ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL



# AJANTA

Volume - IX, Issue - II,
April - June - 2020
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com




Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

Ajanta
Prakashan

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्रातील जलसमस्या व पर्यावरण आणि उपाययोजना<br>**डॉ. भारत एम. राठोड** | १-७ |
| २ | गावगाड्याचे पर्यावरण : का अशी झालीत गावे ?<br>**प्रा. डॉ. कोतमे धिरजकुमार सत्येकाल** | ८-१० |
| ३ | पर्यावरण संवर्धन व समाजाची जबाबदारी<br>**डॉ. गंगणे जीवन सुदामराव** | ११-१६ |
| ४ | जल प्रदुषण - एक गंभीर समस्या<br>**प्रा. राहूल एम. खंडारे** | १७-२० |
| ५ | ई-कचरा आणि पर्यावरणा समोरील समस्या<br>**प्रा. राजेश अनंतराव कांबळे** | २१-२४ |
| ६ | पर्यावरण आणि शासनाची धोरणे<br>**डॉ. संदिप बी. नेरकर** | २५-३० |
| ७ | लोकसंख्या वाढीचे आर्थिक विकासावर परिणाम<br>**डॉ. सांगळे सुधाकर** | ३१-३८ |
| ८ | पर्यावरण आणि शेती<br>**प्रा. डॉ. सर्जेराव गंगाधर गोल्डे** | ३९-४३ |
| ९ | पर्यावरण जागरुकता - एक आव्हान<br>**डॉ. शरद जे. मेश्राम** | ४४-४८ |
| १० | पर्यावरण संरक्षण आणि सहकारी संस्था<br>**प्रा. डॉ. पुरी तात्या बालकिशन** | ४९-५२ |
| ११ | माणसाची गोष्ट आणि पर्यावरण<br>**प्रा. डॉ. येवले शंकरानंद किशनराव** | ५३-५६ |
| १२ | ओझोन थराची कारणे आणि परिणाम<br>**प्रा. आवटे भाऊ दगडोबा** | ५७-६० |
| १३ | पर्यावरणवादी साहित्य व त्याचे महत्त्व : एक अध्ययन<br>**प्रा. डॉ. करंजकर दत्तात्रय श्रीहरी** | ६१-६३ |


Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

# ७. लोकसंख्या वाढीचे आर्थिक विकासावर परिणाम

**डॉ. सांगळे सुधाकर**
जवाहर महाविद्यालय, अणदुर ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

## ०.१ प्रस्तावना

इ.स. १००० साली जगाची लोकसंख्या केवळ ४० कोटी इतकी होती. १८०४ साली जगाची लोकसंख्या १०० कोटी झाली. म्हणजे जागतिक लोकसंख्येच्या ६० कोटीने वाढण्यासाठी ८०४ वर्षाचा कालावधी लागला. पण त्यानंतर लोकसंख्या वाढीचा स्फोट झालाय की काय अशी शंका यावी इतक्या झपाटयाने लोकसंख्या वाढत गेली. जागतिक लोकसंख्या वाढीत ३० टक्के लोकसंख्या ही अपघातातुन झालेली गर्भधारणा किंवा नकोशा गर्भधारणेतुन होते.

देशाच्या आर्थिक विकासाच्या मार्गावर लोकसंख्या ही सकारात्मक अडथळा मानली जाते. भांडवलाने गरीब आणि तंत्रज्ञानाने मागासलेल्या देशात लोकसंख्येची वाढ दर भांडवलाची दरडोई उपलब्धता कमी करुन उत्पादकता कमी करते. देशाच्या आर्थिक विकासाला जास्त लोकसंख्या चांगली नसते.

## ०.२ अभ्यासाची उदिष्टे

१) लोकसंख्या वाढीचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील मर्यादांचा अभ्यास करणे.

२) लोकसंख्या वाढीचे अर्थव्यवस्थेवरील परिणामांचा अभ्यास करणे.

३) लोकसंख्या वाढीचा घनतेचा अभ्यास करणे.

## ०.३ संशोधन पध्दती

हा शोधनिबंध लिहीताना दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. त्यामध्ये नियककालीके, दैनिके, पुस्तके, इंटरनेट

## ०.४ पुर्नविलोकन

१९९७ च्या हयुमन डेव्हलपमेंट रिपोर्ट मध्ये सर डेव्हीड टनबरो म्हणतात, आपल्या सर्वपर्यावरणीय समस्या कमी लोकांसह सोडवणे सोपे होते. अधिक कठीण होते आणि शेवटी अशक्य होते. अधिक लोकसह सोडवणे, सर पीटर स्कॉट व वल्ड लाईफ फंड फॉर नेचर कॉसमॉस मॅगझीनचे २०१० चे संस्थापक म्हणतात, जेव्हा आम्ही डब्ल्युडब्ल्युएफ ची स्थापना केली तेव्हा आमचा हेतू लुप्त होणाऱ्या स्पेसीज या प्रजातीचा नाश होण्यापासून वाचवणे हा होता. पण आम्ही पुर्णपणे अपयशी ठरलो आहोत, आम्ही एकही जतन करण्यास व्यवस्थापीत केले नाही. जर ते पैसे आम्ही कंडोममध्ये ठेवले असते तर आपण काही तरी चांगले केले असते.

जास्त लोकसंख्या कमीतकमी २० व्या शतकाच्या सुरुवातीस पृथ्वीच्या वातावरणात विपरीत परिणाम झाला आहे.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

ग्लोबल फुटप्रिंटच्या नेटवर्कच्या म्हणण्यानुसार आज आपण वापरत असलेले संसाधने पुरवण्यासाठी आणि आपला कचरा शोषण्यासाठी मानवता १.५ ग्रहांचा समत्यूलय वापर करते. इकोसिस्टम सर्व्हिसेस ॲक्ट्रीसनच्या रुपात या पर्यावरणीय ऱ्हासाची आर्थिक परिणाम देखील होत आहेत.

पर्यावरणीय लेखक जेरीमी रिफकिन म्हणतात की, आपली वाढती लोकसंख्या आणि शहरी जीवनशैली ही विशाल परिसंस्था आणि निवासस्थानाच्या किंमतीवर खरेदी केली गेली आहे. जगातील शहरीकरण साजरे करीत असताना आपण त्वरेने दुसरे ऐतिहासिक काम केले पाणलोट व जंगले गायब केली.

क्लब ऑफ रोमच्या शास्त्रज्ञांनी दि लिमीट ऑफ डेव्हलपमेंट नावाने पुस्तक लिहिले जे एक विचारधारा म्हणून स्थापीत केले गेले. त्यामध्ये जगातील वाढती लोकसंख्या एक अहवान मानली जात होती. ती समस्या म्हणून पाहिले जाते. त्यानुसार पृथ्वी ही एक अंतराळयानासारखी आहे. ज्यावर विशिष्ट प्रमाणात रसद, पाणी आणि संसाधने उपलबध असतील व त्यावर जर जास्तीत जास्त लोक वसले गेले तर ते अल्पावधीतच संपेल म्हणून लोकसंख्या नियंत्रण आवश्यक आहे. म्हणून आजदेखील लोकसंख्येकडे एक आव्हान म्हणून पाहिले पाहिजे.

लोकसंख्या वाढ ही संसाधनावर दबाव आणते हे नाकारता येणार नाही. कार्ल हौबचे म्हणजे असे आहे की, गेल्या २००० वर्षात १०० अब्ज लोक जन्माला आले आहेत. २०१९ युनायटेड नेशन्श पॉपुलेशन डिव्हीजनने असा अंदाज वर्तवला होता की, २०२० मध्ये जगाची लोकसंख्या ९.८ अब्ज तर २१ मध्ये ११.२ अब्ज होईल प्रत्यक्षात अनुभवत आहोत.

डॉ. अनिल अगाशे म्हणतात, वाढत्या लोकसंख्येची गरज भागवण्यासाठी शेती उत्पादन साध्य आहे त्यापेक्षा अधिक वाढवणे हे एक आव्हान आहे. वाढत्या लोकसंख्येचा दर २०५० पर्यंत स्थिर होईल. परंतु त्या वेळेपर्यंत भारत हा जगातील सर्वात जास्त लोकसंख्येचा देश बनेल हे त्याचे विधान सध्याच्या लोकसंख्या वाढीच्या दरावरुन प्रत्यक्षात उतरेल असे दिसते.

**०.५ विश्लेषण**

लोकसंख्येचे विश्लेषण करताना त्याची घनता बदलाचा वाढीच्या परिणामाचा विचार केलेला आहे. तो पुढील तक्त्याचा आधारे स्पष्ट केलेले आहे.

**तक्ता क्र. १**

**जगाची लोकसंख्या घनता व वार्षीक बदल (%)**

| अ.क्र. | देश | लोकसंख्या (२०२०) | वार्षीक बदल % | घनता |
|---|---|---|---|---|
| १ | चीन | १,४३९,३२३,७७६ | ०.३९ | १५३ |
| २ | भारत | १,३८०,००४,३८५ | ०.९९ | ४६४ |
| ३ | अमेरीका | ३३१,००२,६५१ | ०.५९ | ३६ |
| ४ | पाकिस्तान | २७३,५२३,६१६ | १.०७ | १५१ |
| ५ | ब्राझील | २२०,८९२,३३० | २.०० | २८७ |
| ६ | नायझेरीया | २१२,५५९,४१७ | ०.७२ | २५ |



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | बांग्लादेश | २०६,१३९,५८९ | २.५८ | २२६ |
| ८ | रुसा | १६४,६८९,३८३ | १.०१ | १.२६५ |
| ९ | मॅक्सिको | १४५,९३४,४६५ | ०.०४ | ९ |
| १० | जपान | १२८,९३२,७५३ | १.०६ | ६६ |
| ११ | इंथोपिया | १२६,४७६,४६१ | ०.३० | ३४७ |
| १२ | फिलीपाईन्स | ११४,९६३,५८८ | २.५७ | ११५ |
| १३ | इजिप्त | १०९,५८१,०७८ | १.३५ | ३६८ |
| १४ | व्हीएतनाम | १०२,३३४,४०४ | १.९४ | १०३ |
| १५ | कॉंगो | ९७,३३८,५७९ | ०.९१ | ३१४ |
| १६ | तुर्की | ८९,५६१,४०३ | ३.११ | ४० |
| १७ | इरान | ८४,३३९,०६७ | १.०९ | ११० |
| १८ | जर्मनी | ८३,९९२,९४९ | १.३० | ५२ |
| १९ | थायलंड | ८९,७३४,२१८ | ०.३२ | २४० |
| २० | यु.के. | ६९,७९९,९७८ | ०.२५ | १३७ |
| २१ | फ्रान्स | ६७,८८६,०११ | ०.५३ | २८१ |
| २२ | इटली | ६५,२७३,५११ | ०.२२ | ११९ |
| २३ | तावझानिया | ६०,६४१,८२६ | ०.१५ | २०६ |
| २४ | साऊथ आफ्रिका | ५९,७३४,२१८ | २.९८ | ६७ |
| २५ | म्यानमार | ५९,३०८,६९० | १.२८ | ४९ |
| २६ | केनिया | ५४,४०९,८०० | ०.६७ | ८३ |
| २७ | दक्षिण कोरीया | ५३,७७१,२९६ | २.२८ | ९४ |
| २८ | होली सी | ५१,२६९,१८५ | ०.०९ | ५२७ |
| २९ | टोकेल एनी | ८०९ | ०.२५ | २ |

७.८ Billion as march २०२० पर्यंत

**Source :** World Omester (www.worldomester.into)

वरील तक्ता क्र. १ वरुन असे दिसून येते की, जगातील एकोणतीस देशांचा विचार केला असता त्यामध्ये असे दिसून येते की, जगाची लोकसंख्या वाढतच आहे. जगात एक नंबरवर चीन आहे, दोन नंबरवर भारत आहे. भारताला चिंतन करण्याची गरज आहे कारण देशातील घनतेचा विचार केला असता ४६४ व्यक्ती इतकी घनता दिसून येते, आर्थिक विकासात ही स्थिती खुपच अडसर ठरत आहे. भारताला मिळालेला भूभाग खुपच कमी आहे. भारतापेक्षा जास्त इजिप्त या देशाची घनता आहे त्यानंतर बांग्लादेशाचा नंबर लागतो. ३५७, लोकसंख्या जलन ग्रामीणभागात वास्तव्य करत आहे. सरासरी आर्युमान भारतामधील व्यक्तीचे २८.४ वर्ष ऐवढे आहे.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

एकुण जमिनीचे क्षेत्र २९७३१९० km२ ११४७९५५ जगात दुसरा क्रमांक लोकसंख्येच्या मानाने जगाची तुलना करता लोकसंख्या १७.७% एवढी आहे. २१ व्या शतकात लोकसंख्या वाढत जाईल परंतु भूतकाळच्या तुलनेत खुपच कमी गतीने वाढेल. १९६९ ला ३ अब्ज ते १९९९ ला ६ अब्जापर्यंत ४० वर्षात जगाची लोकसंख्या दुप्पटीने म्हणजे १००% वाढ झाली आहे. २०३७ पर्यंत ती ९ अब्ज होण्याची शक्यता आहे. म्हणजे आणखीन ४० वर्ष लागतील. २०५७ पर्यंत अंदाजे लोकसंख्या १० अब्ज लोकांपर्यंत पोहोचेल.

जगाची लोकसंख्या १८०४ मध्ये १ अब्ज होती त्यात वाढ होऊन १९३० मध्ये २ अब्ज झाली पुढे १९६० मध्ये ३ अब्ज झ ाली नंतर १९७४ मध्ये ४ अब्ज व १९८७ मध्ये ५ अब्ज येवढी झाली.

जगाच्या भूभागापैकी २.४१ टक्के भूभाग भारताने व्यापलेला आहे. पण जगातील १९६० साली जगाची लोकसंख्या ३०० कोटी इतकी झाली म्हणजे अवघ्या १५६ वर्षामध्ये जगातील लोकसंख्या १०० कोटीवरुन ३०० कोटी झाली. आजच्या तारखेला ७४० लोकसंख्येपैकी भारताची लोकसंख्या १३२ कोटी ७० लाख आहे म्हणजे जागतिक लोकसंख्येच्या १७.७ टक्के लोक भारतामध्ये राहतात. २०२० मध्ये भारत हा जगातील तरुण देश म्हणून ओळखला जातो. आणिख दोन वर्षांनी भारताची ६४ टक्के लोकसंख्या वर्किंग पॉपुलेशन असेल. जगभरात दिसून येणारा लोकसंख्येबद्दलचा विस्थापीत होण्याचा देश असूनही दिसून येतो. एकुण जागतिक लोकसंख्येपैकी ५० टक्के म्हणजेच ३९० कोटी लोक शहरामध्ये विस्थापित झालेले आहेत. २०११ च्या जनगणनुसार भारतातील ३२.४ टक्के लोकसंख्या ही शहरी भागात राहत आहे. जगभरात रोज ८०० महिला गर्भधारणेच्या संदर्भात मरण पावत आहेत. त्या पैकी २० टक्के महिला भारतातील आहेत. म्हणजेच भारतात दररोज १६० महिला गर्भधारणेच्या आजाराने किंवा प्रसुती दरम्यान मरण पावतात. भारतातील ४७ टक्के मुलीचा बालविवाह होतो. वयाच्या १८ वर्षाच्या आतच या मुलींचे लग्न लावले जाते. जगाच्या तुलनेत हे प्रमाण ४६ टक्के इतके रक्कम मोठया प्रमाणात आहे. भारतामध्ये एकुण लोकसंख्येपैकी ४१.१ टक्के लोकसंख्या ही २० वर्ष वयोगटातील आहे. जगातील एकुण भुखंडापैकी २०.४ टक्के भुखंडावर पसरलेल्या भारतामध्ये जगातील लोकसंख्येच्या १७.३ टक्के लोक राहतात. संयुक्त राष्ट्राच्या अंदाजानुसार हे शतक संपेपर्यंत म्हणजेच २१०० पर्यंत जागतिक लोकसंख्येचा फुगवटा झाला तर ती १७०० कोटी पर्यंत जाईल किंवा नैसर्गिक आपत्ती रोगराई व आरोग्य सेवेची कमतरता या सारख्या कमतरतेमुळे कमी होऊन ७०० कोटी इतकीच राहील.

**तक्ता क्र. २**

**वर्षनिहाय देशाची लोकसंख्या**

| अ.क्र. | वर्ष | लोकसंख्या | वार्षीक बदल (%) | घनता (P/km२) | शहरी (%) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०२० | ७,७९४,७९८,७३९ | १.०५ | ५२ | ५६ |
| २ | २०१९ | ७,७१३,४६८,१०० | १.०८ | ५२ | ५६ |
| ३ | २०१८ | ७,६३१,०९१,०४० | १.१० | ५७ | ५५ |
| ४ | २०१७ | ७,५४७,८५८,९२५ | १.१२ | ५७ | ५५ |

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | २०१६ | ७,४६४,०२२,०४९ | १.१४ | ५० | ५४ |
| ६ | २०१५ | ७,३७९,७९७,१३९ | १.१६ | ५० | ५४ |
| ७ | २०१४ | ७,२९५,२९०,७६५ | १.१७ | ४९ | ५३ |
| ८ | २०१३ | ७,२१०,५८१,९७६ | १.१९ | ४८ | ५३ |
| ९ | २०१२ | ७,१२५,८२८,०५९ | १.२० | ४७ | ५२ |
| १० | २०११ | ७,०४१,१९४,३०१ | १.२१ | ४६ | ५१ |
| ११ | २०१० | ६,९५६,८२३,६०३ | १.२२ | ४६ | ५१ |
| १२ | २००९ | ६,८७२,७६७,०९३ | १.२३ | ४६ | ५१ |
| १३ | २००८ | ६,६२३,५१७,८३३ | १.२५ | ४६ | ५१ |
| १४ | २००७ | ६,७०५,९४८,६१० | १.२४ | ४५ | ५० |
| १५ | २००६ | ६,६२३,५१७,८३३ | १.२५ | ४४ | ५० |
| १६ | २००५ | ६,५४१,९०७,०२७ | १.२५ | ४४ | ४९ |
| १७ | २००४ | ६,४६१,१५९,३८९ | १.२५ | ४३ | ४९ |
| १८ | २००३ | ६,३८१,१८५,११४ | १.२६ | ४३ | ४८ |
| १९ | २००२ | ६,३०१,७७३,१८८ | १.२७ | ४२ | ४८ |
| २० | २००१ | ६,२२२,६२०,६०६ | १.२९ | ४२ | ४७ |
| २१ | २००० | ६,१४३,४९३,८२३ | १.३१ | ४१ | ४७ |
| २२ | १९९९ | ६,०६४,२३९,०५५ | १.३३ | ४१ | ४६ |
| २३ | १९९८ | ५,९८४,७३९,९४२ | १.३५ | ४० | ४६ |
| २४ | १९९७ | ५,९०५,०४५,७८८ | १.३८ | ४० | ४६ |
| २५ | १९९६ | ५८२४,९८२,९५६ | १.४० | ३९ | ४५ |
| २६ | १९९५ | ५,७४५,२१२,७७५ | १.४३ | ३९ | ४५ |
| २७ | १९९४ | ५,३३७,४४१,५५८ | १.७९ | ३५ | ४३ |
| २८ | १९९३ | ४,८७०,९२१,७४० | १.८२ | ३३ | ४१ |
| २९ | १९९२ | ४,४५८,००३,५७४ | १.७७ | ३० | ३९ |
| ३० | १९९१ | ४,००३,४८० | १.८९ | २७ | ३९ |
| ३१ | १९९० | ३,७००,४३७,०४६ | २.०६ | २५ | ३८ |
| ३२ | १९९५ | ३,३३९,५८३,५९७ | २.०० | २२ | ३७ |
| ३३ | १९८० | ३,०३४,९४९,९४८ | १.८६ | २१ | ३६ |
| ३४ | १९७५ | २,७७३,०१९,९३६ | १.७७ | १९ | ३६ |
| ३५ | १९७० | २,५८४,०३४,२६१ | १.७७ | १७ | ३४ |

**Source :** (www.wordmeters.into)

वरील तक्ता क्र. २ वरुन असे दिसून येते की, देशाच्या लोकसंख्येचा विचार केला असता १९७० मध्ये शहरी भागात राहणारी लोकसंख्या ३७ टक्के एवढी होती. २०२० मध्ये ती ७६ टक्के एवढी गेलेली आहे. यावरुन असे लक्षात येते की,

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

शहरीकरणाचे प्रश्न निर्माण होत चाललेले आहेत. घनतेचा विचार केला तर असे दिसून येते की, प्रतिकिलोमीटर घनता २५ टक्के एवढी घनता होती. त्यामध्ये वाढ होऊन २०२० मध्ये २२ टक्क्यापर्यंत जाऊन पोहोचली आहे. सरासरी ही दुप्पट झालेली आहे.

लोकसंख्या वृध्द दर २०२० मध्ये १.१% येवढा आहे. जन्मदर हा १८.२% १००० लोकसंख्ये पाठीमागे मृत्युदर हा ७.३% येवढा आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आकडेवारीनुसार भारताची लोकसंख्या १७.७% इतकी आहे. जगाच्या लोकसंख्येत देशाचा क्रमांक २ वर आहे. भारतातील लोकसंख्येची घनता प्रतिकिमी ४६४ येवढी आहे. भारतामध्ये ३५% लोकसंख्या शहरी भागात राहते. वय मर्यादा २८.४ वर्ष आहे. जगाची लोकसंख्या सध्या २०२० च्या दरवर्षाप्रमाणे १.०५% नी वाढत आहे. सध्याच्या लोकसंख्या वाढीचा दर वर्षी ८१ दशलक्ष येवढा आहे. १९६० च्या दशकात लोकसंख्या वाढीचा दर शिगेला पोहोचला तो जेव्हा तो २% एवढा होता हा वाढीचा दरा अध्यावर गेलेला आहे.

भारताच्या लोकसंख्येची घनता १९८० २३४.४% होती. यावरुन २०१८ मध्ये ४५५.४ वर बदलली आहे. सध्या २०२० लोकसंख्या १.३८६,५४९.६४४ येवढी आहे. मध्यम वय ३०.८ वर्षे आहे. साधारण आर्युमान ६९.५ वर्षे, लोकसंख्येची घनता ४६५.२ प्रतीकिमी २ येवढा आहे. तसेच प्रजनदर २०२० मध्ये २.३५ मुले जन्मतात. २०२४ पर्यंत भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश होण्याच्या अंदाज आहे.

**०.६ परिणाम**

वॉटर अँड संस्थेच्या अहवालानुसार जागतिक जमिनीवरील एकुण पाण्याचा वापर भारतीय लोक २४% करतात. देशात ११७० मिलीमीटर पाऊस पडतो. परंतु केवळ ६% पाणी जपुण ठेवले जाते. भारतीय लोक पाणी प्रश्नावर गंभीर न झाल्यास पाणी प्रश्नाला सामोरे जावे लागले. भारतात आजही ७५ टक्के घरात स्वच्छ पाणी पोहोचले नाही. लोकसंख्येची वेगवान वाढ : लोकसंख्येची वाढ रोखूनही अनेक प्रयत्न करुन देखील जन्मदर अजूनही ही जास्त आहे. स्वत:च्या जनगणनेनुसार जन्मदर १.६४६४ टक्के येवढा आहे. कौटुंबिक नियोजनाचे प्रयत्न केले जात नाहीत. असाधारण लिंग रचना : जगातील बहुतेक देशात पुरषापेक्षा महिला जास्त आहेत. भारतात हे थोडे भिन्न आहे. स्त्री मृत्यचे प्रमाण जास्त आहे. राहणीमान व कुपोषणाचे क्लिष्ट प्रमाण : राहणीमानावर देखील त्याच्या लोकसंख्येचा परिणाम जाणवतो. भारतात पोषण आहाराची कमतरता आहे. संतुलीत आहार कमी प्रमाणात मिळतो. राहणीमान देखील निकृष्ठ दर्जाचे आहे. घराची स्थिती अतिशय कमकुवत आहे. बेरोजगारी : लोकसंख्येच्या वाढीच्या दबावामुळे रोजगारक्षम वयोगटातील बेरोजगार तरुणाची फौज वाढत आहे. असे निराश तरुण समाजावर ओझे बनतात. बेकायदेशिर कामात गुंततात, कृषी क्षेत्रावर मोठया प्रमाणात अवलंबुन आहेत. उद्योग आणि सेवाक्षेत्र तुलनेने कमी विकसीत आहेत. अकुशल व अर्धकुशल लोकांसाठी कमी रोजगाराच्या संधी आहेत. पायाभूत सुविधांवर दबाव : पायाभूत सुविधांचा विकास लोकसंख्या वाढीनुसार नाही. याचा परिणाम म्हणजे दळणवळण घरे, शिक्षण आरोग्य, सेवा इ. अभाव आहे. झोपडपट्टी होणारी घरी घरे वाढली आहेत. रहदारीची वाढही दिसून येत आहे. घटलेले उत्पादन व वाढीव खर्च : अन्नधान्य आणि वितरण वाढ लोकसंख्या पकडण्यास सक्षम झाले नाही. म्हणून उत्पादन खर्च वाढला. महागाई हा जास्त लोकसंख्येचा एक

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

वितरीत परिणाम आहे. मर्यादीत स्त्रोताचा जास्तीत जास्त वापर होईल. वैद्यकीय स्थिती खराब होत आहे. आजार वाढत आहेत. भारताचा सार्वजनिक आरोग्य खर्च हा केंद्रे व राज्य सरकार यांची बेरीज २००८-०९ ते २०१९-२० दरम्यान जीडीपीच्या तुलनेत १.२ टक्के ते १.९ टक्के येवढाच राहिलेला आहे. दुसऱ्या देशात जास्त आहे. चीनचा २ टक्के, जर्मनीत ४.४ टक्के. शिक्षण मिळताच ते समाजाचे कल्याण विकास करतील नाही तर ते ओझे ठरतील. शिक्षण मिळाले तरच ते देशसेवा करु शकतील. परंतु वाढत्या लोकसंख्येला शिक्षणाच्या पुरेशा साई व संधी मिळणे कठीण झाले आहे. शिक्षणावरील खर्च कमीच राहिलेला आहे. जीडीपीच्या केवळ २.८ टक्के येवढा आहे. साधनसंपत्ती व उर्जेची कमतरता गुन्हेगारीचे वाढते प्रमाण स्थलांतरण जंगलतोड अपुरी निवास व्यवस्था.

**०.७ पुढील कारणांमुळे वाढती लोकसंख्या आर्थिक विकासावर मर्यादा टाकू शकतात**

१. वाढती लोकसंख्या भांडवलाच्या निर्मितीचे दर कमी करते.

२. लोकसंख्येच्या उच्च दरासाठी अधिक गुंतवणुकीची आवश्यकता असते.

३. दरडोई भांडवलाची उपलब्धता कमी असते.

४. भांडवली उत्पन्नावर वाढत्या लोकसंख्येचा विपरीत परिणाम होतो.

५. जास्त लोकसंख्येमुळे बेरोजगारीची समस्या निर्माण होते.

६. वेगाने लोकसंख्या वाढल्यास अन्न पाण्याची समस्या निर्माण होते.

७. वाढत्या लोकसंख्येचा शेती क्षेत्रावर ताण पडतो.

८. दारिद्रद्रयात राहणाऱ्याची शहरात लोकसंख्या वाढते.

९. कामगाराची कार्यक्षमता कमी होते.

१०. वाढत्या लोकसंख्येस पायाभूत सुविधा अपुऱ्या पडतात.

११. वाढत्या लोकसंख्येचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होतो.

१२. आत्मविश्वास वाढण्यास अडचण ठरत असते.

१३. कृषी विकासात अडचण ठरते.

१४. वाढती लोकसंख्या राहणीमान निकृष्ठ दर्जाचे राहते.

**०.८ उपाययोजना**

१) उत्तम शिक्षण दिले पाहिजे.

२) कर आकारले पाहिजे, कमी अपत्यास सवलती दिल्या पाहिजेत.

३) उत्तम लैंगिक शिक्षण दिले गेले पाहिजे.

४) धोरणात बदल केले पाहिजे.

५) नैतिक संयम ठेवण्यास नैतिक शिक्षणाचे धडे दिले पाहिजेत.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

६) मोबाईल रुग्णालय सारख्या सोईत वाढ व्हायला हवी.

७) अंधश्रध्देचे निर्मुलन केले पाहिजे.

८) कुटुंब नियोजनाच्या यशस्वीतेसाठी योग्य जाहीराती कराव्यात.

**०.९ संदर्भ**

१) भारतीय अर्थव्यवस्था : दत्त सुंदरम

२) लोकसत्ता अंक २०१८

३) https://www.sideshwar.net

४) (www.worldomester.into)

५) (www.wordmeters.into)

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad